जा.क्र/जिपगों/पसं/आस्था-१/ २२० /२०१८
**(पशुसंवर्धन विभाग )**
जिल्हा परिषद गोंदिया
दिनांक :- १५/ २ / २०१८

प्रति,

उप मुख्य कार्यकारी अधिकारी
(सामान्य)
जिल्हा परिषद, गोंदिया

**विषयः- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत १ ते १७ मुद्याचे अनुपालन सादर.**

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्राचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया या कार्यालयातील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत १ ते १७ मुद्याचे अनुपालन तयार करुन पुढील कार्यवाहीस्तव सादर.

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,**
**जिल्हा परिषद, गोंदिया.**

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पशुसंवधन विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया या कार्यालयाच्या दर्शनी भागावर माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ अंतर्गत सहायक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलिय अधिकारी यांचे फलक लावण्यात आलेले आहे सबब प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

स्थळ :- गोंदिया
दिनांक :-

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,**
**जिल्हा परिषद, गोंदिया.**

# पशुसंवर्धन विभाग

## जिल्हा परिषद , गोंदिया

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

नियम ४(१) (ख) नुसार प्रसिद्ध करावयाची माहिती
वर्ष २०१७-२०१८

# सौ. शैलजाताई कमलेश सोनवाने

सभापती

पशुसंर्वधन समिती

जिल्हा परिषद, गोंदिया

दुरध्वनी क्र. ०१७८२ -२३१६८६

**अभिप्राय**

शासकीय कामकाजाची संपुर्ण माहिती सर्वसाधारण नागरिकांना अवगत होण्यासाठी तथा शासकीय कामात पारदर्शकता राहण्यासाठी केन्द्र शासनाने दिनांक १२/१०/२००५ रोजी संपुर्ण देशात शासकीय माहितीचा अधिकार लागु केलेला आहे, त्याबददल मी, केन्द्र शासनाचा आभारी आहे.

तसेच माहितीचा अधिकार सर्व साधारण नागरिकांना निश्चितच लाभदायक ठरणार आहे . त्यामुळे पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया, यांनी प्रकाशित केलेली १७ मुददयावरील माहितीचा योग्य उपयोग करुन घ्यावा असे सर्व नागरिकांना माझे निवेदन आहे. त्याचप्रमाणे प्रसिध्द करण्यात आलेली माहितीसाठी, मी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया तथा त्यांना सहाय्यता करणा-या पशुसंवर्धन विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे मनपुर्वक अभिनंदन करतो.

सही -

**(सौ. शैलजाताई कमलेश सोनवाने)**

सभापती

पशुसंर्वधन समिती

जिल्हा परिषद गोंदिया

# डॉ . आर. व्ही. वासनिक

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद] गोंदिया
. दुरध्वनी क्र. :- (कार्यालय) ०७१८२ - २३४१३१

# अभिप्राय

केन्द्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा दिनांक १२ ऑक्टोंबर २००५ रोजी संपुर्ण देशभरात लागु केलेला आहे.अधिनियमानुसार पशुसंवर्धन विभागा अतंर्गत चालविलेल्या संपुर्ण कामकाजाची माहिती सर्वसामान्य जनतेस उपलब्ध करुन देण्यासाठी केन्द्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे नियम ४(क) (ख) अन्वये माहितीपुस्तीका भाग १ व २ प्रसिध्द करण्यात येत आहे

तरी सर्व नागरीकांनी माहिती पुस्तीकेचा आवश्यक माहितीसाठी योग्य उपयोग करावा.

सही-
**(डॉ . आर.व्ही. वासनिक)**
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद, गोंदिया

# प्रस्तावना

पशुपालकांना त्यांचे पशुधनाचे रक्षण /आनुवांशिक ,सुधारणा, पशुपालकांना पशुसंवर्धन विषयक विकास योजना ,लोकशिक्षण कार्याचा लाभ मिळावा ,या करिता पशुसंवर्धन विभाग ,राज्य शासनासचे नियम १००अन्वये जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत केला आहे .

भंडारा जिल्हयाचे विभाजन दिनांक १/५/१९९९ पासुन गोंदिया जिल्हा अस्तित्वात आला आहे. गोंदिया जिल्हा मुख्यालयाची पशुसंवर्धन विभाग दिनांक २२/०३/ २००३ पासुन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे पदस्थापनेने अस्तित्वात आला असुन कार्यरत आहे.

## पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | प्रष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | खात्याच्या /संस्थेच्या कामकाजाची व कर्तव्याची संपुर्ण माहिती. | ५ |
| २ | अधिका-याचे व कर्मचा-याचे अधिकार व कर्तव्य | ६ |
| ३ | निर्णय घेण्याचे अधिकार व जवाबदारी | ७ |
| ४ | कामकाजाची कार्य पध्दती . | ७ |
| ५ | अधिकारात येणारे नियम ,परिपत्रके, सुचना इत्यादी. | ८ |
| ६ | खात्याचेअख्त्यारित येणारे कागदपत्रे. | ८ |
| ७ | प्रशासकीय कामाचा दृष्टिकोन व निती निर्धारण संबधाने सर्वसामान्याचे परामर्शकरिता करण्यात आलेली व्यवस्था. | ९ |
| ८ | जनतेसाठी खात्यातंर्गत स्थापन्यात आलेल्या समित्या व त्यांची कार्यपध्दती. | ९ |
| ९ | जिल्हा पशुसंवर्धन विभागातील अधिकारी /कर्मचारी यांची यादी. | १० |
| १० | खात्यातील अधिकारी कर्मचा-यांना उपलब्ध असलेली मासिक प्राप्ती भरपाई इत्यादी. | १० |
| ११ | खात्याच्या विनियोगासाठी वेगवेगळी उपलब्ध निधी योजना , खर्चाच्या तरतुदी वापंर. | ११ |
| १२ | सबसिडी उपलब्ध असल्यास ती माहिती कार्यक्रम व लाभार्थी बाबतची माहिती. | ११ |
| १३ | सवलती ,परवाना,अधिकार,याबाबत जे अधिकार आहेत ,ती माहिती. | १२ |
| १४ | इलेक्ट्रानिक माध्यामाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती. | १२ |
| १५ | सर्वसाधारणाकरिता माहिती उपलब्ध करण्यासाठी असलेली सवलत तसेच वाचनालयाची व्यवस्था. | १२ |
| १६ | अपिलीय अधिकारी माहिती अधिकारी व सहायक माहिती अधिकारी यांची माहिती | १३ |
| १७ | विहीत केलेली इतर माहिती आणी वेळोवेळी अद्यावत केलेली प्रकाशने. | १३ |

# माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (१) ख नुसार प्रसिध्द करावयाची माहिती.

**१) पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद गोंदिया ची रचना कार्य व कर्तव्य.**

**रचनाः-**

जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत असलेल्या विविध विभागापैकी पशुसंवर्धन विभागातील रचना खालीलप्रमाणे आहे.

१) गोंदिया जिल्हयात पशुसंवर्धन विभागाचे कार्य राज्यस्तरीय ३१ व स्थानिकस्तरीय (जि.प. अंतर्गत ) ७२ याप्रमाणे एकुण १०३ पशुवैद्यकीय संस्थामार्फत करण्यात येते. त्यात १ फिरते पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी -१ कार्यरत आहे.

२) उपरोक्त पशुवैद्यकीय संस्थापैकी राज्यस्तरीय १० व स्थानिकस्तरीय ४२ याप्रमाणे एकूण ५२ संस्थांना पशुवैद्यकीय पदवीधारक व उर्वरीत राज्यस्तरीय २१ व स्थानिकस्तरीय ३० याप्रमाणे एकुण ५१ संस्थांना पशुवैद्यकीय पदविकाधारकाची पदे मंजूर आहेत.

३) पशुधन घटकाचे प्रमाणात १९ वी पशुगणनेनुसार एकुण ४९९७८५ पशुधन घटक असुन १०० संस्था आवश्यक असून + ३ संस्था अतिरिक्त आहे.

४) जिल्हा पशुसंर्वधन अधिकारी हे महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवेतील वर्ग-१ चे अधिकारी असतात व ते या विभागाचे विभागप्रमुख म्हणून काम पाहतात.

५) डॉ आर.व्ही.वासनिक जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी या पदावर दिनांक १५.११.२०१६ पासुन कार्यरत आहेत.

६) जिल्हा परिषदेअंतर्गत जिल्हा पशुसवंर्धन अधिकारी यांचे नियंत्रणात पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचयात समिती यांचे कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्था पशुसवंर्धन खात्याच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे पशुवैद्यकीय सेवा व पशुआरोग्याचे कार्य करीत आहेत.

७) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी व त्यांचे अधिनिस्त कर्मचारी व अधिकारी यांचा रचना दर्शक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

उपरोक्त कार्यवृत्त पशुवैद्यकीय संस्थामार्फत जनतेच्या पशुधनांना पशुवैद्यकीय सेवा व अनुषंगिक सुधारणा कार्य करण्यात येते . त्याचप्रमाणे संस्थामार्फत पशुसवंर्धन विषयक विकास योजनांचा लाभ जनतेस देण्यात येते.

## २) अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्य.

१) आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कामांच्या व विकास परियोजनांच्या बाबतीत तांत्रिक मंजुरी देता येईल.

२) विभाग प्रमुखाला प्रत्येक वर्षी , आपल्या विभागात काम करणा-या वर्ग -२ , ३, ४च्या सेवेतील अधिका-यांच्या व कर्मचा-यांचे कामाचे मुल्यमापन करील आणी त्याबाबदचे आपले मत गोपनियरित्या मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे पाठविल .

३) आजारपणामुळे किंवा इतर वाजवी कारणामुळे प्रतिबंध झाला नसल्यास, तो जिल्हा परिषदेच्या व तिचा सचिव असेल अशा समितीच्या प्रत्येक सभेत उपस्थित राहील आणी त्यास, पीठासीन प्राधिका-याच्या परवानगीने ,सभेत ज्या बाबींवर चर्चा असेल तिच्या संबंधात माहीती किंवा स्पष्टीकरण देता येईल.

१) जिल्हा परिषदे अंतर्गत जिल्हा पशुसवंर्धन अधिकारी यांचे नियंत्रणात पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचयात समिती यांचे कार्यक्षेत्रातील पशुवैद्यकीय संस्था पशुसवंर्धन खात्याच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे पशुवैद्यकीय सेवा व पशुआरोग्याचे कार्य करीत आहेत.

२) जिल्हयातील पशुसंवर्धन विभागांतर्गत विषयक योजना प्रभावीपणे राबविण्याचे दृष्टीने ७२ पशुवैद्यकीय दवाखाने व १ फिरते पशुचिकीत्सालय पथक असुन जनावरांच्या आरोग्य सेवेची संधी उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.

३) पशुसंवर्धन विभागामधील राष्ट्रीय सम विकास योजनेतंर्गत विविध योजनेकरीता तरतुद करण्यांत आलेली आहे. याकरीता १०० टक्के शासनाचा सहभाग आहे.

## ३) निर्णय घेण्याचे अधिकार व जबाबदारी

महत्वाच्या विषयावर, नवनविन योजनांच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी पशुसंर्वधन व दुग्धशाळा समितीच्या माध्यमातून निर्णय घेत असतात. पशुसंर्वधन व दुग्धशाळा समितीने सहमत केलेले ठराव, स्थायी समिती व नंतर सर्वसाधारण सभेमध्ये ठेवुन त्यानुसार कार्यवाही केली जाते.

पशुसंर्वधन व दुग्धशाळा समिती, स्थायी समिती व सर्वसाधारण सभा यांनी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने जिल्हा पशुसंर्वधन अधिकारी करीत असतात. जिल्हा पशुसंवधन अधिकारी, पर्यवेक्षण करतात.

## ४) कामकाजाची कार्यपध्दती

कर्तव्य पार पाडण्यासाठी वेगवेगळे काम किती वेळामध्ये पूर्ण व्हावयास पाहिजे याबाबत शासनाने दिलेल्या निर्देशानुसार प्राधान्य देण्यांत येत ते खालीलप्रमाणे.

| अ.क्रं. | पत्राचा प्रकार | कार्यवाही करावयाचा कालावधी |
|---|---|---|
| १ | प्राधान्य | प्रथम प्राधान्य |
| २ | तात्काळ | त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी |
| ३ | तातडिने | ४ दिवसाचे आंत |
| ४ | कालमर्यादित | दिलेल्या कालमर्यादित |
| ५ | सर्वसाधारण | एक आठवडयाचे आंत |

**५) अधिकारात येणारे नियम / परिपत्रके / सुचना इत्यादी**

कार्यालयातील दैनंदिनी प्रशासकीय कामे पार पाडण्याकरीता महाराष्ट्र शासनाने विषय निहाय सेवाशर्ती नियम पुस्तिका उदा. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ आणि वर्तणुक नियम १९६७ महाराष्ट्र लेखा संहीता अधिनियम १९६८ तसेच त्यातर्गत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासकीय नियमान्वये कर्मचारी आपली दैनंदिन कर्तव्य व कामे पार पाडण्याच्या दृष्टीने प्रयत्नशिल असतात व नियमाचे आधारे कार्यवाही करण्यांत येते.

**६) खात्याच्या अखत्यारित येणारे कागदपत्रे.**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६४ क्रमांक झेड.पी.आर-२९२९५-पी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम २७४ पोट कलम ८० अन्वये अभिलेख्याचे वर्गीकरणानुसार रचना व कार्यपध्दती अंतर्गत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यालयीन स्वच्छता | :- कार्यालय परिसर रोज स्वच्छ करण्यांत येत असते. |
| २) | कार्यालयांत बसण्याची स्वच्छता | :- कार्यालयातील उपलब्ध जागेनुसार बसण्याची व्यवस्था लखीना पॅटर्न प्रमाणे करण्यांत आली आहे व उर्वरीत कर्मचारी टेबल जागेअभावी. जागेनुसार लावण्यांत आली आहे. |
| ३) | कपाट, रॅकेची मांडणी | :- कार्यालयातील कपाटे / रॅकेची संबंधित कर्मचा-यांचे जवळ भिंती लगत लावण्यांत आले असुन त्यामुळे कार्यालयात सतत उजेड राहतो व हवा खेळती राहत असते. |
| ४) | कामाची विभागणी | :- प्रत्येक कर्मचा-यांना कामाची विभागणी करुन देण्यांत आलेली आहे त्यानुसार प्रत्येकाला कपाट व टेबल देण्यात आले आहे. तसेच प्रत्येकांना त्यांचेकडे असलेल्या कामाच्या सुची कागद लावण्या बाबत सुचित करण्यात आले आहे. |
| ५) | अभिलेखाचे वर्गीकरण | :- कागदपत्राचे भविष्यकालीन महत्व व उपयोगिता किती आहे व किती काळपर्यंत जमा करुन ठेवणे आवश्यक आहे याबाबतचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे. |

| अभिलेखाचे वर्ग | जतन करावयाचा कालावधी |
|---|---|
| अ | कायम |
| ब | ३० वर्षे |
| क | १० वर्षे |
| क-१ | ०५ वर्षे |
| ड | १ वर्षे किंवा त्यावर्षांचे लेखा परिक्षण होईपर्यंत. |

वरील बाबीचा अवलंब केल्यामुळे कार्यालयीन कामाची गती वाढविण्यास मदत होते.

**७) प्रशासकीय कामाचा दृष्टीकोण व निती निर्धारण संबंधाचे सर्व सामान्याचे परामर्शकरीता करण्यांत आलेली व्यवस्था**

महाराष्ट्र शासनाने स्विकारलेल्या त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या पशुसंवर्धन विषयक विकास योजना व पुरविण्यात येणाऱ्या सेवा जलदगतीने पुरविण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक १०२७/सी आर ११२/०८ दिनांक२३ जुन १९९९ अन्वये सनद प्रसिध्द करण्यात आली आहे .

जिल्हयाचे ग्रामीण भागातुन पशुसंवर्धन योजनाचे बाबतीत वेगवेगळया समस्याघेवुन येणा-या नागरीकांचे समस्याचे निराकरण करण्याकारता या विभागातर्फे तक्रार निवारण कक्ष तयार करण्यात आले असुन , तक्रार घेवुन येणा-या नागीरकाचे तक्रार पशुधन विकास अधिकारी (तात्रिक ) यांचे कडे नोंदवुन संबधित पंचायत समिती कडुन समितीकडुन माहिती घेवुन निराकरण करण्यात येत आहे.

पशुसंवर्धन विभागाअतंर्गत तसेच पंचायत समिती स्तरावर पशुधन विकास अधिकारी (विस्तार) नेमण्यात आले असुन ,त्यांचे द्ववारे विभागातील कामाची माहीती देण्यात येत असते.

**८) जनतेसाठी स्थापण्यात आलेल्या समित्या व त्यांची कार्यपध्दती**

पशुसंवर्धन विभाग हे दिनांक १/०४/२००३ पासुन अस्तित्वात आले असुन या विभागामध्ये काम करणारे अधिकारी राज्य शासनाचे असुन कर्मचारी हे मुळ जिल्हा परिषदेचे जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावरचे आहेत. पशुसंवर्धन समिती ही ९ सदस्यीय समिती जिल्हा परिषदेने गठीत केली असुन या समितीची प्रत्येक महिण्याला सभा घेण्यांत येते. या बैठकीचे कार्यवृत्त जनतेला पाहावयास मिळण्याजोगी आहेत.

## ९) पशुसंवर्धन विभागातील अधिकारी / कर्मचारी यांची यादी.

**पशुसंवर्धन** विभागातील अधिकारी यांची पदे शासनाकडुन तसेच इतर वर्ग-३ व वर्ग-४ चे कर्मचा-यांची पदे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडुन भरण्यात येत असतात. कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची यादी सोबत जोडली आहे .

| अ.क्र | पदनाम | नाव | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | डॉ . आर. व्ही. वासनिक | १५६००-३९१०० ग्रे.पे ५७००/- |
| २ | पशुधन विकास अधिकारी (तां) | डॉ. पी. एल. बोरकर | १५६००-३९१०० ग्रे.पे ५४००/- |
| ३ | कनिष्ठ प्रशासन अधिकारी | श्री. डी. एम. श्रीवास्तव | ९३००-३४८०० ग्रे.पे.४३००/- |
| ४ | सहायक पशुधन विकास अधिकारी | श्री. एम. यु. हरीणखेडे | ९३००-३४८०० ग्रे.पे.४४००/- |
| ५ | पशुधन पर्यवेक्षक | श्री. आर.आर.अॅन्ड्रस्कर | ५२००-२०२०० ग्रे.पे.२८००/- |
| ६ | वरिष्ट सहायक | श्री .ए.जी.देसाई | ९३००-३४८०० ग्रे.पे.४२००/- |
| ७ | कनिष्ट सहायक(लेखा) | श्री. आर.एम.रंगारी | ५२००-२०२०० ग्रे.पे.२८००/- |
| ८ | कनिष्ट सहायक | श्री. बी.के.पटले | ५२००-२०२०० ग्रे.पे.२८००/- |
| ९ | परिचर | श्री. पी.डी.बोरकर | ४४४०-७४४० ग्र.पे.१६००/- |
| १० | परिचर | सौ.एम.डी.कुंभलकर | ४४४०-७४४० ग्र.पे.१६००/- |

## १०) पशुसंवर्धन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना उपलब्ध असलेली मासिक प्राप्ती व भरपाई

जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यान्वित असलेल्या पशुसंवर्धन विभागातील कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्यावर होणारा खर्च २४०३ पसं व २५०३ जिल्हा परिषदांना अनुदान शासनाकडुन प्राप्त होत असून कार्यरत सबंधित पंचायत समितीला वितरीत केल्या जाते. पंचायत समिती अंतर्गत सदर अनुदानातुन झालेला खर्च दर महिन्याला सादर करण्यात येते संपुर्ण जिल्हयातील पंचायत समितीनिहाय खर्चाचा अहवाल तयार करुन संबंधित विभागास पाठविण्यात येते. इतर कर्मचाऱ्यांचे पगारपत्रके हे जिल्हा परिषद वित्त विभागाला सादर करण्यात येवून चेकव्दारे रक्कम प्राप्त होताच संबंधित कर्मचाऱ्यांना वेतन राष्ट्रियकृत बँकेव्दारे करण्यात येते.जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी व जिल्हयातील पशुधन विकास अधिकारी यांचे वेतन व भत्ते जिल्हास्तरावरुन पशुसंवर्धन विभागामार्फत तयार करुन कोषागार कार्यालय गोंदिया यांना सादर केले जाते. संबंधित देयकाचे चेक मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांचे कडुन प्राप्त होताच संबंधित अधिकाऱ्यानी राष्ट्रियकृत बँकेत उघलेल्या खात्यात जमा करण्यात येते .

**११) खात्याच्या विनियोगासाठी वेगवेगळी उपलब्ध निधी योजना खर्चाच्या तरतुदी व वापर**

शासनाने दिलेल्या सुचनेनुसार या विभागाव्दारे अंदाजपत्रके तयार करण्यांत येतात व त्यांस मंजुरी प्राप्त होताच योजनावर खर्च करण्यांत येवुन होणरा खर्च हा शासनाने दिलेल्या तरतुदीपेक्षा जास्त होणार नाही याबाबत विशेष काळजी घेण्यांत येते.

**१२) सबसिडी उपलब्ध असल्यास ती माहिती कार्यक्रम लाभार्थीबाबत माहिती.**

**१) जिल्हा वार्षिक योजना :-**

**अ) बिगरआदिवासी योजना**

१) संकरीत कालवडी व सुधारित पारडयांना खाद्य अनुदान
२) कामधेनु दत्तक ग्राम योजना
३) कुकुट पिल्लांचे गट वाटप
४) बैरण बियाणे वाटप

**२) जनजाती क्षेत्र उपयोजना:-**

अ) दुधाळू जनावरांचे गट वाटप
ब) शेळी गट वाटप
क) तलंग गट वाटप

**३) जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजना:-**

अ) दुधाळू जनावरांचे गट वाटप
ब) तलंग गट वाटप
क) शेळी गट वाटप

**४) विशेष घटक योजना अनुसुचित जाती उपयोजना -**

१) दुधाळू जनावरांचे गट वाटप
२) दुधाळू जनावरांना खादय अनुदान.
३) अनुसुचित जाती /नवबौध्द लार्भाथ्याना शेळीचेगट वाटप

**५) विशेष केंद्रिय सहाय योजना.**

१) अॅस्कॅड अंतर्गत लाळया खुरकत रोगावर नियंत्रण ठेवणे.
२) तालुकास्तरिय प्रशिक्षण
३) लस टोचणी कार्यक्रम व बुळकांडी रोग सर्वेक्षण .
अ) मोटार वाहन
ब) इंधन व तेल

**१३) सवलती, परवाना, अधिकार याबाबत चे अधिकार आहेत ती माहिती.**

------------------नाही------------------------

**१४) इलेक्ट्रानिक माध्यमाव्दारे उपलब्ध करुन देण्यांत आलेली माहिती.**

विभागातील माहिती संगणकावर तयार करुन वरीष्ठ कार्यालयास किंवा नागरीकांना पुरविण्यांत येत असते.

**१५) सर्वसाधारणकरीता माहिती उपलब्ध करण्यासाठी असलेली सवलत तसेच वाचनालयाची व्यवस्था.**

जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीमध्ये पहील्या माळयावर ग्रंथालय आहे. त्यात स्वंयप्रेरणेने प्रकाशित करावयाची माहिती ठेवण्यांत आली आहे. विभागवार माहिती अधिकारी / अपीलीय अधिकारी यांची नेमणुक करुन तसे फलक दर्शनी भागावर लावण्यात आले आहेत. तळमजल्यावर स्वागत कक्ष आहे. अर्जदारास या कक्षातही आवश्यक ते मार्गदर्शन करण्यांची सोय करण्यांत आली आहे.

**१६) माहिती अधिकारी व सहाय्यक अधिकारी यांची माहिती.**

| अ. क्रं. | अपीलीय माहिती अधिकारी | जनमाहिती अधिकारी | सहाय्यक माहिती अधिकारी |
|---|---|---|---|
| | डॉ. आर.व्ही.वार्सनिक<br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,<br>जि.प.गोंदिया. | श्री.डी.एम.श्रीवास्तव<br>कनिष्ठ प्रशासन अधिकारी<br>जि.प.गोंदिया. | श्री.ए.जी.देसाई<br>वरिष्ठ सहाय्यक<br>जि.प.गोंदिया. |

**१७) विहीत केलेले इतर माहिती आणि वेळोवळी अद्यावत केलेली प्रकरणे.**

महाराष्ट्र जिल्हा परिषद अधिनियम १९६१ चे कलमामध्ये पशुसंवर्धन विभागाच्या कामकाजा बाबत वार्षिक प्रशासन अहवाल दरवर्षी जिल्हा परिषदेची मान्यता प्राप्त करुन घेवुन प्रसिध्द करण्यांत येते.

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,**
**जिल्हा परिषद, गोंदिया.**

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया या कार्यालयाच्या दर्शनी **भागावर** माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ अंतर्गत सहायक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलिय अधिकारी यांचे फलक लावण्यात आलेले आहे सबब प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

स्थळ :- गोंदिया
दिनांक :-

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,**
**जिल्हा परिषद, गोंदिया.**